# मुंबई शहर कबड्डी असोसिएशन

संलग्न : महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

नोंदणी : मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० क्रमांक एफ-४२७२

## ६१ वा वार्षिक अहवाल
## जमाखर्च - सन २०२५-२०२६




**कार्यालय**

भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड, मुंबई - ४०००३१.

ईमेल : kabaddimumbai@yahoo.in

वेबसाईट : mumbaishaharkabaddi.com

# मुंबई शहर कबड्डी असोसिएशन

## कार्यकारिणी समिती सन २०१९-२०२४



स्व. मारुती रामा जाधव
आजीव अध्यक्ष



श्री. अशोक (भाई) अर्जुनराव जगताप (आमदार)
अध्यक्ष



श्री. शिवकुमार उदय लाड
उपाध्यक्ष



श्री. मनोहर शावजी इंदुलकर
कार्याध्यक्ष



डॉ. गो. वि. पारगांवकर
उपाध्यक्ष



श्री. रामचंद्र मारुती जाधव
कार्योपाध्यक्ष



श्री. विश्वास तुकाराम मोरे
प्रमुख कार्यवाह



श्री. अनिल सदाशिव घाटे
कार्योपाध्यक्ष



श्री. भरत नबाजी मुळे
संयुक्त कार्यवाह



सौ. शुभांगी दिनेश पाटील
खजिनदार



श्री. शरद कृष्णा कालंगण
संयुक्त कार्यवाह

# कार्यकारिणी समिति सन २०१९-२०२४



श्री. आनंदा महादेव शिंदे
(सदस्य)



श्री. दिनेश दामोदर पाटील
(सदस्य)



श्री. संजय शिवराम सुर्यवंशी
(सदस्य)



श्री. चंद्रशेखर नारायण राणे
(सदस्य)



श्री. महेंद्र अनंत हळदणकर
(सदस्य)



श्री. अनिल शिवराम केशव
(सदस्य)



श्री. विद्याधर सहदेव घाडी
(सदस्य)



श्री. मनोहर आत्माराम साळवी
(सदस्य)



श्री. सुशिल कृष्णकांत ब्रीद
(सदस्य)



श्री. शिवाजी ज्योतिबा बावडेकर
(सदस्य)



श्री. मिलिंद श्रीधर कोलते
(सदस्य)



श्री. नितीन चंद्रकांत कदम
(सदस्य)



श्री. नितीन अशोक विचारे
(सदस्य)



श्री. राजामणी धरमार नाडार
(सदस्य)



श्री. सुर्यकांत कृष्णा देसाई
(सदस्य)



श्री. संदीप बंडू काळगांवकर
(सदस्य)



श्री. प्रसाद प्रभाकर कोलगे
(सदस्य)



स्व. दगडू बाबू वलावंडे



श्री. मनोज महादेव नमसले
(सदस्य)

# मुंबई शहर कबड्डी असोसिएशन

संलग्न - महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन
नोंदणी - मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० क्रमांक एफ - ४२७२
भारतीय क्रीडा मंदिर, नायगांव-वडाळा रोड, मुंबई- ४०००३१

## वार्षिक सर्वसाधारण सभा

स.न.वि.वि.

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनची सन २०२४-२५ ची ६१ वी **"वार्षिक सर्वसाधारण सभा** रविवार दिनांक ०६.०९.२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई - ४०००३१ येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व संलग्न संस्था प्रतिनिधींनी वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेपुढील विषय :**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.

२) सन २०२५-२०२६ च्या वार्षिक अहवालास मंजुरी देणे.

३) सन २०२५-२०२६ चा वार्षिक जमाखर्च व ताळेबंद मंजूर करणे.

४) सन २०२६-२०२७ सालाकरिता लेखा परिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करून मंजूरी देणे.

५) सन २०२६-२०२७ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.

६) कार्यकारिणी समितीच्या संमतीने आलेल्या सुचनांचा विचार करुन त्यावर निर्णय घेणे.

७) मुंबई शहर कबड्डी असोसिएशन पंचवार्षिक निवडणुकीविषयी चर्चा.

८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.

**सूचना :**

१. गणसंख्येच्या अभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी त्याच स्थळी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. सदर सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२. संस्थांचे जे प्रतिनिधी मतदानासाठी नोंदविलेले आहेत, त्यांनाच घटनात्मकरित्या सभेच्या कामकाजात भाग घेता येईल. संस्थेने सन २०२५-२०२६ वर्षाची वार्षिक वर्गणी भरलेली असावी. तसेच संस्था प्रतिनिधींजवळ असोसिएशनच्या वतीने देण्यात आलेले ओळखपत्र असणे बंधनकारक आहे.

३. संलग्न संस्थांच्या प्रतिनिधींना सर्वसाधारण सभेपुढे अहवाल, जमाखर्च व ताळेबंद तक्ता या संबंधी काही सूचना करावयाच्या असतील त्यांनी लेखी स्वरुपात दिनांक ०२/०९/२०२६ ते ०४/०९/२०२६ सायं. ६.०० ते ८.०० वा. पर्यंत कार्यालयात पाठवाव्यात, अशा लेखी सूचनांवर कार्यकारिणीच्या संमतीने विचार केला जाईल.

आपला नम्र

**श्री. विश्वास तुकाराम मोरे**
(प्रमुख कार्यवाह)

**कार्यालय**
भारतीय क्रीडा मंदिर
वडाळा, मुंबई - ४०० ०३१
कार्यालय वेळ - सायं. ६.०० ते ८.००
(रविवार व सुट्टीच्या दिवशी कार्यालय बंद राहील)

# ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनची सन २०२४-२०२५ ची ६० वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २४/०८/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वा. भारतीय क्रीडा मंदिर (वडाळा) येथे आयोजित करण्यात आली.

सभा सुरु करताना प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान मा. आमदार श्री. भाई जगताप यांनी भूषविण्याची सुचना सभागृहास केली.

सूचक - **श्री. विश्वास मोरे** अनुमोदन - **श्री. सुनिल नवले**

सर्व प्रथम अध्यक्षांनी सौ. शुभांगी पाटील यांना महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनकडून निरिक्षक म्हणून उपस्थित असलेल्या मा. सौ. लीना कांबळी-कर्पे मॅडम यांना व्यासपीठावर घेवून येण्याची विनंती केली. तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते, असोसिएशनचे कार्योपाध्यक्ष श्री. रामचंद्र जाधव व श्री. अनिल घाटे, संयुक्त कार्यवाह श्री. शरद कालंगण व श्री. भरत मुळे यांना व्यासपीठावर निमंत्रित केले. सभेला उपस्थित सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त राष्ट्रीय खेळाडू व उपस्थित जिल्हा प्रतिनिधी यांचे स्वागत केले.

प्रास्ताविक करताना प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले, तसेच या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अहवाल आपल्याला हस्ते परहस्ते किंवा पोष्टाने मिळाले असतील याची खात्री केली.

**श्रध्दांजली :-** मा. श्री.विश्वास मोरे यांनी या वर्षात गुडमॉर्निंग संघाचे राष्ट्रीय खेळाडू दिवंगत संतोष विश्वेकर, यंग विजय संघाचे राष्ट्रीय खेळाडू श्री. दिलीप मोरे यांच्या मातोश्री, न्यु इंडिया इंश्युरन्सचे श्री. मंगेश मोरे यांच्या पत्नी, तसेच चालु वर्षी दुःखद निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात व्यक्ती यांना सभागृहात दोन मिनिटे उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**अभिनंदन :-** अहवालात नमुद केलेल्या सर्व मान्यवर, मुंबई शहरचे पुरूष-महिला कबड्डी संघाचे अभिनंदन केले. तसेच गेली २० वर्षे मा. आमदार श्री. भाई जगताप यांच्या बरोबर काम करीत असताना राज्य कबड्डी असोसिएशन, अखिल भारतीय कबड्डी फेडरेशन, प्रो-कबड्डी मध्ये त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व यशस्वी कामगिरी करित आहोत असे सुचविले आणि त्यांच्या बरोबर काम करताना ते आपल्या सहाकाऱ्यांवर कोणत्याही निवड प्रक्रियेत ढवळा ढवळ न करता सर्व अधिकार त्यांना देत पारदर्शक निवड प्रक्रिया राबविली असल्याने ठाणे येथे सुध्दा महिला (पश्चिम विभाग)

हा मुंबई संघ उपविजयी ठरला आणि पुरुष संघ उपांत्य उपविजयी ठरला. छत्रपती शिवाजी महाराज चषक २०२४-२५ मुंबई (पूर्व विभाग) पुरूष संघ अंतिम विजयी व मुंबई (पश्चिम विभाग) महिला संघ हा उपविजेता ठरला. मा. आमदार भाई जगताप यांची ही घोडदौड पाहता आम्हा सर्वांना त्यांचा सार्थ अभिमान वाटतो. तरी आपण सर्व खेळाडू/प्रशिक्षक/व्यवस्थापक यांचे टाळ्या वाजवून कौतुक करण्यास विनंती केली व या पुढील सभेच्या विषयांवर मार्गदर्शन करण्याची विनंती अध्यक्षांना केली.

**विषय क्र. १ : मागील सभेचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.**

या विषयावर चर्चा करताना अध्यक्षांनी असे सुचविले की, वार्षिक अहवालाच्या प्रती उपलब्ध आहेत, तरी कृपया आपण याचे वाचन तर केले असालच तर या इतिवृत्तांतामध्ये काही त्रुटी किंवा काही उल्लेख राहून गेले असतील तर आपण सुचित करावे अन्यथा आपण हात उंचावून मंजूरी दर्शवावी असे सुचविले असता सभागृहाने हात उंचावून मंजूरी दर्शवली.

**सूचक :-** श्री. संदिप काणेकर **अनुमोदन :-** श्री. निवृत्ती आजगेकर

**विषय क्र. २ : सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवालास मंजुरी देणे.**

मा. अध्यक्ष श्री. भाई जगताप यांनी सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहापुढे मंजूरीस ठेवताना सांगितले की, वारंवार अहवाल मिळत नाही अशी काही संघांच्या तक्रारीवर नोंद घेवून अहवाल ऑनलाईन प्राप्त होतील अशी संकल्पना करावी. या वार्षिक अहवाल, ताळेबंद, अंदाजपत्रक संबंधी कोणत्याच संस्थांकडून लेखी तक्रार व सूचना आलेल्या नाहीत. तरी सुध्दा आपल्या काही सूचना असल्यास मनमोकळेपणाने मांडाव्यात. अहवालावर चर्चा होऊन सन २०२४-२०२५ च्या वार्षिक अहवालास सर्वांनुमते मंजुरी देण्यात आली.

**सूचक :-** श्री. शैलेंद्र नार्वेकर **अनुमोदन :-** श्री. साईनाथ काळसेकर

**विषय क्र. ३ :** सन २०२४-२०२५ चा वार्षिक जमाखर्च व ताळेबंद मंजूर करणे.

सन २०२४-२०२५ चा वार्षिक जमाखर्च व ताळेबंद मंजूर करणे, यावरती सभागृहाने वार्षिक जमाखर्च व ताळेबंदला मान्यता देण्यात आली.

**सूचक :-** श्री. महेश घुडे **अनुमोदन :-** श्री. सुनिल नवले

**विषय क्र. ४ : सन २०२५-२०२६ सालाकरिता लेखा परिक्षकांची नेमणुक करणे व त्यांचे मानधन निश्चित करून मंजूर करणे.**

यावर खजिनदार सौ. शुभांगी पाटील यांनी **"शिरसाट ॲन्ड चव्हाण"** हे आपले लेखापरिक्षक असून त्यांचे मानधन रूपये १२,०००/- आहे. त्यावर त्यांना

रुपये १,०००/- वाढवून रुपये १३,०००/- करण्यात यावे अशी सूचना सभागृहात केली. ती सर्वांनुमते मंजूर करण्यात आली.

**सूचक :-** सौ. शुभांगी पाटील **अनुमोदन :-** श्री. सुर्यकांत कदम

**विषय क्र. ५: सन २०२५-२६ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.**

आपल्या अहवालात अंदाजपत्रक नमुद केले आहे. वर्षभरात आपल्याला जास्तीत जास्त कबड्डी स्पर्धा, कार्यक्रम व विविध उपक्रम या करिता आपण नियमीतपणे अंदाज पत्रक तयार करीत असतो. आगामी अंदाज पत्रकासाठी सूचना करू शकता. सभागृहात सर्वांनुमते अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली

**सूचक :-** श्री. मनोहर साळवी **अनुमोदन :-** श्री. सदानंद चव्हाण

**विषय क्र. ६ : कार्यकारिणी समितीच्यावतीने झालेल्या सुचनांचा विचार करून त्यावर निर्णय घेणे.**

यावर लेखी सूचना आलेल्या नसुन कार्यकारिणी समितीच्या अंतर्गत काही सूचना असून त्या सभासदांना आवगत करून, वर्षभरात येणाऱ्या विविध अडचर्णींवर तोडगा काढणे अशी विनंती प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी केली.

१) १४ वर्षाखालील मुले/मुली खेळाडू नोंदणी शुल्क व स्पर्धा मान्यता शुल्क (नाममात्र) आकारण्यात यावा.

२) जशी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन / अखिल भारतीय कबड्डी फेडरेशन लाईफ टाईम खेळाडू नोंदणी फी आकारते, तशी आपण रू २००/- फक्त प्रत्येक खेळाडूंचे आकारून नोंदणी करावे.

३) महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या परिपत्रकानुसार ज्या खेळाडूचे आधारकार्ड ज्या जिल्ह्याचे असेल तो खेळाडू त्या जिल्ह्यातुनच खेळेल. बाहेरील जिल्ह्यातील खेळाडूंनी येथे नोंदणी करू नये. तरी हे विषय वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवत आहोत. तरी यावर काही सूचना असतील त्या तुम्ही मांडू शकता असे प्रमुख कार्यवाह यांनी सुचविले. या विषयात अध्यक्षांनी असे सुचविले की, या सभागृहात राष्ट्रीय खेळाडू सुध्दा आहेत. कबड्डी आपली फार उंचीवर गेलेली आहे आणि महाराष्ट्र राज्यात मुंबई शहर व मुंबई उपनगरचे जास्त योगदान आहे. तसेच इतर राज्य ही जशी हरियाणा, उत्तर प्रदेश, कर्नाटक व इतर राज्य चांगली कामगिरी कबड्डी क्षेत्रात करीत आहेत. कबड्डीकडे बघताना आंतरराष्ट्रीय दृष्टीने पाहिलं जात म्हणून आपल्याला नियमांमध्ये बदल करत असताना हा आंतरराष्ट्रीय पुरोगामी परिणाम आपणावर होतो. त्या दृष्टीने आपण

काळाप्रमाणे बदल केले पाहिजे आणि म्हणून यामध्ये कोणाची सूचना असेल तर अधिक चांगले होईल, कारण महाराष्ट्र राज्याची जेव्हा वार्षिक सर्वसाधारण सभा होते, तेव्हा यावर चर्चा होते. म्हणून श्री. विश्वास मोरे यांनी प्रस्ताव ठेवलेला आहे, यावर आपल्याला काम करता येईल. जर यावर तुमच्या सूचना असतील तर त्या तुम्ही करण्यास काहीच हरकत नाही. वार्षिक सर्वसाधारण सभेत सदस्यांनी आपल्या सूचना मांडण्याचा पूर्ण अधिकार असतो, म्हणजे कार्यकारिणी समितीने जे प्रस्ताव ठेवलेले आहेत ते आपण सर्व मंजूर करीत आहोत.

४) नवोदित संघाचे श्री. चिकणे मास्तर "आपण जे आता खेळाडू आधार कार्ड विषय हा जो मांडला आहे. परंतु मुंबईतील परिस्थिती अशी आहे की, आपली जी स्थनिक मुले आहेत ती कमी खेळतात व बाहेरच्या जिल्ह्यातून युवा मुले खेळतात ती मुंबई, रायगड, पुणे तसेच ठाणे अशा प्रसिध्द जिल्ह्यातून खेळण्यास उत्सुक असतात आणि आपण हा नियम केला तर ते संघांनाही खूप अडचणीचे आहे व त्या मुलांचे नुकसान आहे", तरी यावर पुनर्विचार केला जावा अशी सूचना मांडली. यावर अध्यक्षांनी व आपण सर्वांनी एक लक्षात घ्या की, हा नियम आपण केलेला नाही हा नियम झालेला आहे आणि हा नियम महाराष्ट्र राज्याने राबवून त्यावर अंमलबजावणी करण्यास सुरूवात केली आहे. तरी हा आपला प्रस्ताव विचाराधीन असून यावर काही मार्ग काढण्याचे आश्वासन दिले.

**विषय क्र. ७ : <u>मुंबई शहर कबड्डी असोसिएशन पंचवार्षिक निवडणुकी विषयी चर्चा.</u>**

याबाबत अध्यक्षांनी खुलासा करताना राज्य संघटनेत कामकरीत असताना आम्ही आमच्या पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य यांच्या बैठकीत निवडणुकीचा प्रस्ताव ठेवून ती निवडणूक घेतली. परंतू आपणा सर्वांना माहितच असेल कोर्टातून त्यावर स्थगिती आलेली आहे. कारण स्पोर्टस् कोड जो आहे, यामुळे अनेक राज्यांनी यावर आपली वेगवगळी मते मांडलेली आहेत. त्यामुळे आपल्याला माहित असेल १८ ऑगस्ट २०२५ मध्ये राष्ट्रीय प्रशासन कायदा हा प्रस्ताव संमत केलेली आहे. हे कबड्डी पुरतेच मर्यादित नसुन सगळ्या खेळांना हा कायदा आहे. संसदेत दोन्ही सभागृहामध्ये याविषयी चर्चा केली गेली, त्यानुसार ज्या अडचणी येतात त्या कशा दूर करायच्या आणि म्हणून एक वेगळी गाईडलाईन आता येईल. ज्या वेळी नविन कायदा येतो तेव्हा त्याच्या मार्गदर्शक सूचना ही येतात. जशा की स्पोर्टस् कोड च्या आल्या होत्या. महाराष्ट्र राज्याच्या निवडणूक प्रक्रियेला स्थगिती (स्टे) असल्याने कोणत्याही जिल्ह्याच्या निवडणूकीचा प्रश्नच येत नाही. राज्याच्या

झाल्या की जिल्ह्याच्या निवडणुकीचा प्रश्नच येत नाही. राज्याच्या झाल्या की जिल्ह्यांच्या याच घटनेनुसार निवडणूका घेता येतील. परंतू स्पोर्टस् कोड मध्ये आता नविन कायद्यामध्ये रूपांतर केलेले आहे.

भाई म्हणाले मी संसदेत नाही, परंतू आपल्या मुंबईचे खासदार सन्मानीय श्री. अरविंद सावंत यांना या विषयात लक्ष देण्याची विनंती केलेली आहे आणि लवकरच यासंदर्भात नविन मार्गदर्शक नियमावाली (गाईड लाईन) येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवीन मार्गदर्शक नियमावलीची राज्य संघटनेला कोर्टाची स्थगिती असल्याने आपण आपल्या जिल्ह्याच्या निवडणूक घेऊ शकत नाही. वाट बघत सगळेच थांबलेले आहेत. कबड्डी प्रेमी मंडळी आहेत त्यांना याविषयी माहिती देणे गरजेचे होते.

**विषय क्र. ८ : <u>अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय.</u>**

श्री. सदाभाई चव्हाण काही संस्था ह्या जिल्ह्याचे नियम व अटी मानून सामने घेत आहेत परंतू काही संस्था ह्या गोष्टी नाकारून नियमबाह्यपणा करीत आहेत.

यावर अध्यक्ष श्री. भाई जगताप यांनी बेशिस्त संघांवर, खेळाडूंवर यापूर्वी कारवाई झालेली आहे आणि कोणत्याही एका संघामुळे जर शिस्त बिघडत असेल तर त्यावर कठोर कारवाईचे आदेशही दिलेले आहेत. परंतू कोणत्यातरी एका संघामुळे खेळाडूचे/ संघाचे नुकसान होवू नये म्हणून आम्ही ज्यावेळी कार्यकारिणीची सभा होईल त्यात यावर गंभीरपूर्वक चर्चा करण्याचे आश्वासन भाईंनी दिले. कित्येकवेळा आपल्याला माहित आहे आपल्या सामनाधिकारी यांना पूर्णतः स्वरक्षित केलेले आहे, कारण ते जेव्हा सामन्यांवर असतात तेव्हा यांचा निर्णय हा अंतिम निर्णय असतो. तेव्हा काही गोष्टी इकडे-तिकडे होतच असतात. त्याचा उल्लेख मी माझ्या संबोधनातून करीनच. परंतू जो हा विषय मांडला आहे, त्यावर मी कार्यकारिणीला सल्ला देईन की आपण कशा संदर्भात हे आहे ते बघून घ्या आणि माझ्यापर्यंत तो अहवाल द्या. त्यावर आपण लवकरच निर्णय घेवू.

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. भाई जगताप यांनी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन कडून निरिक्षक म्हणून लाभलेल्या श्रीमती लीना कांबळी-कर्पे मॅडम यांचा शाल, पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

अध्यक्षीय भाषणात व्यासपीठावरील उपस्थित सन्मानीय पदाधिकारी,कार्यकारिणी सदस्य, राष्ट्रीय खेळाडू व संलग्न संघ प्रतिनिधी यांचे स्वागत केले. आपल्या परंपरेनुसार आपल्या सभा ह्या वादांवर थांबत नसून आपण वाद होऊच देत नाही. याचा दुसरा अर्थ असा होतो की, ज्या काही खेळाडूंना समस्या असतील जे संघप्रमुख येथे येतात

ते आपल्या-आपल्या परीने जे संघ चालवित असतात, त्यांना त्यांच्या पध्दतीने आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे. काही वेगवेगळे मतभेद असतात आणि ते असायलाच हवेत पण लोकशाही प्रगल्भ व्हावी असे वाटत असेल किंवा झाली असं वाटत असेल तर, आपल्यात मत-मतांतर हे असले पाहिजे. परंतु मत-मतांतर म्हणजे काही वाद असं नाही म्हणण्याचं कारण नाही. आपण उदात्त भावनेने २० वर्षे एकत्र काम करीत आहोत. मला कधीही आठवत नाही की, एवढे पदाधिकारी झाले त्यांनी कधीही मनामध्ये आकस ठेवून काम केले नाही आणि असल्या टिमचा मी कॅप्टन (अध्यक्ष) असल्याचा अभिमान मला आहे. त्याबद्दल मला तुमचे अभिनंदन करावेसे वाटते.

अनेक संस्थांमध्ये मी काम करतो. मी २८७ ठिकाणी अध्यक्ष असून वार्षिक सर्वसाधारण सभा कधी घ्यावी ? ही पंचायत असते परंतु माझे कार्याध्यक्ष ती बाजू सांभाळत असतात.

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या संपूर्ण टिमचे मी कौतूक करतो. येथे खेळाडू येत असतात काही सूचना मांडत असतात. त्या नुसत्या ऐकून न घेता त्यावर तात्काळ आम्ही अंमलबजावणी करीत असतो. असे सांगण्यात आले की, निवड प्रक्रिया ही वादाचा विषय आहे. परंतु मी कधी त्यात पडलोच नाही. कोणता संघ उजवा/डावा हे मी कधी केलं नाही आणि हे आपणाला माहितच आहे. मला काही लोकांची कीव वाटते की, त्यांना जे मुंबई शहर मध्ये करता आल नाही ते जेव्हा या टिमने २० वर्षे करून या मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचा डोलारा सांभळला आणि याची चर्चा जेव्हा महाराष्ट्र राज्यामध्ये होते, तेव्हा सार्थ अभिमान वाटतो. परंतु काही असंतुष्ट आत्मे असतात त्यांना हे बघवत नाही. काल जो काही ठाण्यामध्ये प्रकार झाला त्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो आणि आम्ही हा ठरावच घेत आहोत, या घटनेची माहिती मी ठाण्यातील लोकांकडूनही घेतलेली असल्याचे नमूद केले. या संदर्भात सन्माननीय अजितदादांशी चर्चा झाली असल्याचे सांगितले आणि आमच्या सदस्यांनी ज्या काही गोष्टींचा उल्लेख केला. एवढी लाचारी मी आजतोवर पाहिली नाही. आम्ही कधी हटणार नाही आणि म्हणून पूर्ण सभागृह निषेधाचा ठराव पारित करीत आहोत आणि याची नोंद घेण्यात यावी की, खेळ मोठा की इकडे-तिकडे फिरणारे उंदीर मोठे किंबहूना आम्ही प्रत्येकाला मोठेपणा, त्यांच्यासाठी राज्य पातळीवर म्हणा, देशपातळी म्हणा मी त्यांच्यासाठी प्रयत्न केले आहेत आणि माझ्या सहकाऱ्यांवर/जिल्ह्याला कमी समजत असेल तर माझे नाव भाई जगताप आहे हे विसरू नका आणि जिल्ह्याचा खेळाडू असेल माझा मुंबई शहराचा संघ असेल याबाबती मध्ये जर कोणी वाईट दृष्टी काही कुरघोडी करण्याचा प्रयत्न करत असेल तर महाराष्ट्र राज्याच्या बैठकीमध्ये

हा विषय उचलणार आहेच कारण असल्या या उंदराना जे आपल्या स्वार्थासाठी संघटनेचा वापर करतात, नेत्यांचा वापर करतात असल्या लोकांना जरब बसायला हवी. कारण कबड्डी खेळ हा मोठा आहे. ती व्यक्ती खेळा पेक्षा मोठी नाही. ठाण्याला जो प्रकार घडविण्याचा प्रयत्न झाला त्यासाठी हा निषेधचा ठराव आहे. मी कबड्डी कधीही खेळलो नाही, पण मी एक स्पोट्समन आहे. क्रीकेट व इतर खेळांविषयी मला माहिती आहे. परंतु खेळाच्या इतिहासात असे कधीही घडले नाही की, तो संघ विजयी झाला. तुम्ही सर्व सह्या करून ठरवता आणि परत दुसऱ्या दिवशी त्या संघाला मैदानात उतरवण्याची सक्ती करता. आपण हे सर्व जाणता हा प्रकार येथे मी थांबून गप्प बसणार नाही. काळजी करू नका माझं दादांशी या विषयी बोलणं झालेले आहे की नुसते वार्षिक सर्वसाधारण सभेपुरते बोलून हा विषय थांबावयाचा नाही. तर आपण यावर सविस्तर लिखित पत्रक तयार करा. आपण ते पाठवून देवू जेणेकरून मुंबई शहरचा हेवा वाटणारे अनेक आहेत. मुंबई शहर कबड्डी असोसिएशन व मुंबई जिल्हा हा मानाचा मानबिंदू आहे. या महाराष्ट्र राज्याच्या स्पर्धांना गालबोट लावणारे जे कोणी लोक आहेत, त्यांनी हे जाणावे. आपल्या ज्या भावना आहेत, त्या पूर्णतः या ठरावामध्ये मांडणार असल्याचे नमूद केले.

यानंतर एक गोष्ट आणखी स्पोर्टस् कोड-स्पोर्टस् संदर्भात जे काही चालले आहे याबाबत सर्व देशभर चर्चा झाल्या, राज्यभर झाल्या आणि याचे पडसाद संसदेतही उमटले आणि काही मंत्री हे क्रीडामंत्रीच होते जसे की, राजवर्धन राठोड त्यामुळे कदाचित हा नविन कायदा लागू झालेला आहे. या संदर्भात मी मुंबईचे राज्याचे खासदार मा. श्री. अरविंदजी सावंत यांच्या संपर्कात असल्याचे नमुद केले. क्रिकेट नंतर सगळ्यात जास्त लोकप्रियता आहे ती आपल्या कबड्डीला आहे लक्षात घ्या, म्हणजे फुटबॉल/ क्रिकेट नंतर कबड्डीला लोकप्रियता सगळ्यात जास्त आहे. कबड्डी खेळ मोठा होत आहे. खेळाडू मोठे होत आहेत आणि त्यामुळे आपल्याला अभिमान आहे. परंतू मोठे होत असताना हे बाजार बुणगे जे आहेत, ते खेळाला बदनाम करीत असताना एकाधिकार शाहीचा प्रयत्न ते करीत आहेत. याबाबतीमध्ये नक्कीच त्यांचा निषेध करीत असताना हा जो नवीन कायदा पारित झालेला आहे. त्याचे पूर्णता विवेचनासुध्दा अभ्यासणे गरजेचे आहे मी आपली जी कमिटी आहे त्यांना मी सांगू इच्छितो की, जे ज्येष्ठ खेळाडू आहेत त्यांच ज्ञान, योगदान आहे अशा मंडळींना बोलवून घ्या, मुंबईतील नव्हेत तर मुंबई उपनगरातील जरी असले तरी चालतील. कारण हा प्रश्न देशाचा आहे, जिल्ह्यांचा नाही की राज्यांचा, त्यामुळे सर्वांना सामावून घ्यावे असे सुचविले. स्पोर्टस् कोड चा जो गोंधळ आहे, तो या कायद्याच्या माध्यमातून कमी होईल आणि तो व्हावा अशी अपेक्षा आहे आणि म्हणून देशपातळीवर असेल राज्यपातळीवर असेल

ज्या खेळाडूंनी विशेषत मुंबई शहराने खेळाडूंनी आपलं प्राविण्य दाखविले आहे. या ठिकाणी आपलं वेगळेपण ज्यांनी सिध्द केलेले आहे, त्या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन. आपल्या सर्वांना धन्यवाद देतो की, आपली चर्चा सर्वत्र होते. एवढे मोठे मुंबई शहर, एवढे संघ परंतु काही मोठी झाली का असा आपला समज आहे. कारण मला तेही जिल्हे माहित आहेत जिथे १५-१६ संघच आहेत आणि त्यातील कुंटुंबाचे ८ संघ आहेत याची मी चर्चा महाराष्ट्राच्या स्तरावर केलेली आहे. पण आपल्या मनात उदात्त भावना ठेवून आम्ही ज्या पध्दतीने मुंबई शहर कबड्डी असोसिएशन व मुंबई उपनगरनेही कबड्डी क्षेत्रात चांगले काम केलेले आहे. आपली आणि त्यांची स्पर्धा नाही. म्हणून आपण दोघे एका ठिकाणी आणि अख्ख राज्य एका ठिकाणी ही वस्तुस्थिती सांगतोय. पुणे शहराने कबड्डी क्षेत्राचा प्रचार प्रसार चांगलाच केलेला आहे. परंतु इतर शहरांमध्ये तो व्हायला पाहिजे, तो होत नाही आहे. मुंबईने कबड्डी खेळाला नव्या नव्या उपक्रमाला नेहमीच उत्तेजन दिलेले आहे.

सभा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनकडून निरिक्षक म्हणून उपस्थित असलेल्या मा. सौ. लीना कांबळी-कर्पे मॅडम, उपस्थित असोसिएशनचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व संघ प्रतिनिधी या सर्वांचे आभार व्यक्त करून सभा संपली असे जाहीर केले.

# मुंबई शहर कबड्डी असोसिएशन

संलग्न : महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

नोंदणी : मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम - १९५० क्रमांक एफ -४२७२


| | | | |
|---|---|---|---|
| मारुती रामा जाधव<br>आजीव अध्यक्ष | भाई अर्जुनराव जगताप (आमदार)<br>अध्यक्ष | शिवकुमार उदय लाड<br>गो. वी. पारगांवकर<br>उपाध्यक्ष | मनोहर शावजी इंदुलकर<br>कार्याध्यक्ष |
| रामचंद्र मारुती जाधव<br>अनिल सदाशिव घाटे<br>कार्योपाध्यक्ष | विश्वास तुकाराम मोरे<br>प्रमुख कार्यवाह | भरत नवाजी मुळे<br>शरद कृष्णा कालंगण<br>संयुक्त कार्यवाह | शुभांगी दिनेश पाटील<br>खजिनदार |


जावक क्रमांक : मु.श.क.अ./०४/२०२५-२७

दिनांक : १३/०४/२०२६

प्रति,
मा. अध्यक्ष / कार्यवाह,
संलग्न संस्था,
मुंबई.

महोदय,

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या रविवार, दि.२४ ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आजीवन (Life Time) खेळाडूंची नोंदणी चा प्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला. या प्रस्तावास सभागृहात मान्यता देण्यात आली असून खेळाडू नोंदणी फी रुपये २००/- एकदाच आकारण्यात येईल याची सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.

आपला नम्र

मुंबई शहर कबड्डी असोसिएशन वडाळा, मुंबई - ३१

श्री. विश्वास मोरे
(प्रमुख कार्यवाह)

# मुंबई शहर कबड्डी असोसिएशन

## कार्यकारिणी पावसाळी शिबिर

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे कार्यकारिणी सदस्यांचे पावसाळी शिबिर रविवार दिनांक १५ ते १८ जून २०२५ या कालावधीत हॉटेल रॉयल एअर पोर्ट, नेपाळ येथे घेण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन  दिनांक १५ जून २०२५ रोजी सायंकाळी ठिक ७.०० वा. असोसिएशनचे कार्योपाध्यक्ष श्री. रामचंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व शिबिराचे प्रमुख अतिथी श्रीमती तुळशी थापा (अध्यक्ष - नेपाल कबड्डी असोसिएशन) तसेच श्री. अरविंद कुमार (जनरल सचिव - नेपाल कबड्डी असोसिएशन) यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलीत करून झाले. या प्रसंगी असोसिएशनचे सन्माननीय प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे, संयुक्त कार्यवाह श्री. शरद कालंगण, श्री. भरत मुळे, खजिनदार सौ. शुभांगी पाटील, शिवछत्रपती पुरस्काराच्या मानकरी व पाहुण्या सौ. गौतमी आरोसकर व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

शिबिरास सुरूवात करण्यापूर्वी या शिबिराचे अध्यक्षस्थान श्री. रामचंद्र जाधव यांनी स्विकारावे असे प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी सूचित केले. त्यांस सर्वानुमते अनुमोदन देण्यात आले. श्री. विश्वास मोरे यांनी शिबिराला सुरूवात करताना सन्माननीय प्रमुख अतिथी श्रीमती तुळशी थापा (अध्यक्ष - नेपाल कबड्डी असोसिएशन), श्री. अरविंद कुमार (जनरल सचिव - नेपाल कबड्डी असोसिएशन), शिवछत्रपती पुरस्काराच्या मानकरी व पाहुण्या सौ. गौतमी आरोसकर आदि मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देवून सन्मानीत केले. त्यानंतर श्री. अरविंद कुमार यांनी उपस्थित कार्यकारिणी सदस्यांना सभागृहास आपले विचार मांडून संबोधित केले. तसेच श्रीमती तुळशी थापा यांनी सुध्दा आपले विचार मांडले व दोन्ही असोसिएशन एकजुटीने काम करू असे सुचविले व सर्वांचे आभार मानले.

त्यानंतर प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी शिबिराचे अध्यक्ष श्री. रामचंद्र जाधव यांच्या परवानगीने शिबिरास सुरूवात करताना प्रथम मृतव्यक्तीनां श्रध्दांजली वाहिली.

**श्रध्दांजली** :- गुजरात विमान दुर्घटनेत बळी पडलेले नागरिक व विजय बजरंग व्यायाम शाळेचे सर्जेराव पाटील यांचे बंधू स्व. बाजीराव पाटील, महेंद्र राऊत यांच्या पत्नी, ज्ञात-अज्ञात व्यक्तींना सभागृहात श्रध्दांजली वाहण्यात आली.

असोसिएशनच्या वर्षभरातील कार्याचा आढावा घेतला असता असोसिएशनचे अध्यक्ष मा. श्री. भाई जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली असोसिएशनची यशस्वी वाटचाल

होत आहे. कबड्डीची वाढती लोकप्रियता लक्षात घेवून कबड्डी खेळाडू व असोसिएशनची जबाबदारी वाढली आहे. असोसिएशनचा गत वर्षाचा आढावा पाहता पुढील कार्यासाठी धोरणात्मक निर्णय या शिबीरात घेण्यात येणार आहेत.

शिबिरात गतवर्षाच्याकाळात असोसिएशनच्या कार्याचे सिंहावलोकन करून स्पर्धा आयोजक, निरिक्षक, पंच प्रमुख यांनी सादर केलेल्या लेखी अहवालावर चर्चा घडवून विषयपटलावरील सर्व विषय संवेदनशीलते हातळताना सर्वकस चर्चा करून महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

गटवारी समितीने सादर केलेल्या गटवारीला मान्यता देण्यात आली. संघ श्रेणी, स्पर्धा आयोजन करणाऱ्या संस्था, सामनाधिकाऱ्यांच्या अडचणी व सूचना, जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा, शालेय स्पर्धा, जिल्हा, राज्य व अखिल भारतीय स्तरावरील पंच वर्ग-परीक्षा, उदयन्मुख होतकरू खेळाडूंसाठी प्रशिक्षण शिबिर, असोसिएशनची आर्थिक बाजू, खेळाडू संघ बदली, खेळाडू निधी, कबड्डी विकास निधी या सर्वांचा आढावा घेताना वार्षिक सर्वसाधारण सभेत आलेल्या विधायक सूचना यावर चर्चा करून कबड्डी खेळ, खेळाडू असोसिएशन संलग्न संस्था यांचे रित व प्रगतीचे ध्येय नजरेसमोर ठेवून विविध समित्या गठीत करण्यात आल्या. मुंबई जिल्हाच्या मान्यतेने इतर ठिकाणी स्पर्धा खेळत असताना १४ खेळाडूंची मान्यता मिळाली आहे, त्यामुळे कमीत कमी १० खेळाडू असणे गरजेचे आहे. जिल्हा चाचणी स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त संघ सहभागी होतील या करीता या नियमास शिथिलता देण्यात आली आहे. परंतु ज्या संघाचे अ आणि ब भाग असतील अशा संघामध्ये कमीत कमी १० खेळाडू असणे गरजेचे आहे, असे ठरविण्यात आले.

मा. प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी पुढील येणाऱ्या निवडणूक संदर्भात सभागृहात माहिती दिली. या चर्चेत उपस्थित सदस्यांनी आपले विचार मांडले.

त्यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी आपले शिबिर नेपाल या देशात आयोजित करून आपण या शिबिरास उपस्थित राहिलात त्या सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांचे प्रामुख्याने आभार मानले.

शिबिर संपल्यानंतर त्याच ठिकाणी असोसिएशनचे संयुक्त कार्यवाह श्री. भरत मुळे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणीची सभा झाली व शिबिरात घेण्यात आलेल्या निर्णयांना सर्वांनुमते मंजूरी देण्यात आली.

शिबिर यशस्वी करण्यासाठी असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांनी सहकार्य केल्याबद्दल प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून शिबिराची यशस्वी सांगता करण्यात आली.

## मुंबई शहर कबड्डी असोसिएशन पंच पावसाळी शिबिर

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या पंचांचे शिबिर शनिवार दिनांक १२ ते १३ जुलै २०२५ रोजी हॉटेल सिलँड, अलिबाग येथे संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन प्रमुख पाहूणे मा. श्री. महेश सावंत (आमदार), श्री आस्वाद पाटील (मा. प्रमुख कार्यवाह - महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन), श्री. कैलाश पाटील (उपविभाग प्रमुख - शिवेसेना), श्री. विश्वास मोरे (प्रमुख कार्यवाह - मुंबई शहर कबड्डी असोसिएशन), श्री. संजय सूर्यवंशी (छत्रपती पुरस्कार विजेते) यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले.

शिबिरास सुरूवात करण्यापूर्वी राष्ट्रीय खेळाडू श्री. संतोष विश्वेकर यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. शिबिराच्या सुरूवातीला प्रमुख कार्यवाह मा. श्री. विश्वास मोरे यांनी उपस्थित प्रमुख अतिथी यांचे शाल व पुष्पगुच्छ देवून आभार मानले. त्यानंतर आमदार श्री. महेश सावंत यांनी मार्गदर्शन करून मनोगत व्यक्त केले. तसेच श्री. आस्वाद पाटील यांनी सुध्दा उपस्थित सर्व पंचांना मार्गदर्शन केले.

शिबिरास श्री. विश्वास मोरे यांनी सर्व उपस्थित पंचांना सूचना देताना अखिल भारतीय फेडरेशनच्या नियमात बदल करण्यात येणार आहे. तरी आपल्या पंचांकडून काही नियमाबाबतीत सूचना असतील तर लेखी स्वरूपात कळवावे. कबड्डी खेळाचे नियम या संबंधी निर्णय देताना पंचांमध्ये एकसूत्रीपणा असावा व सामने निर्दोष पणे व्हावेत यासाठी शिबिराचे आयोजन करून चर्चा सत्र घडवून आणले जाते. अखिल भारतीयस्तरावर स्पर्धा घेत असताना कबड्डी खेळाच्या नियमांच्या आधारे क्रीडांगणावर सामन्यांच्या दरम्यान होणाऱ्या क्रिया व नियमांच्या चौकटीत राहून कसे निर्णय देण्यात यावेत या घटना विशाद केल्या. कबड्डी नियमावरून पंच स्नेहल घवाळी यांनी प्रश्न विचारले असता, त्याच श्री. विश्वास मोरे यांनी निरसन केले. काही पंचांनी आपल्याला येणाऱ्या समस्या मांडल्या, यावर योग्य ते मार्गदर्शन प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी केले.

त्यानंतर पंच अध्यक्ष श्री. महेंद्र हळदणकर यांनी प्रस्तावना करताना प्रथम उपस्थित सर्व पंच व कार्यकारिणी सदस्यांचे आभार व्यक्त केले. पंचांना आपले मनोगत व्यक्त करीत असताना शिबीरात पंच एकसूत्रीपणा आणि नीटनेटका दिसला पाहीजे या करीता पंचांना टी-शर्ट माझ्याकडून देतो आणि जे पंच या शिबिरास उपस्थित रहातात त्यांना टी–शर्ट दिले जातात. या संदर्भात राजाराम येसरे यांचा जो गैरसमज झाला होता त्याचे निरसन श्री. महेंद्र हळदणकर यांनी केले. उपस्थित पंचांचे आभार मानून संध्याकाळचे सत्र संपविले.

दिनांक १३ जुलै २०२५ सकाळचे सत्र १०.०० वाजता सुरू करण्यात आले. सकाळच्या सत्राची सुरूवात करण्यापूर्वी पंच सदस्य श्री. अमर डोंगरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देवून सुरूवात झाली. त्यानंतर कबड्डी दिनाचे निमित्त देण्यात येणारा ज्येष्ठ पंच पुरस्कार म्हणून श्री. प्रकाश चव्हाण यांना मिळाला त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

त्यानंतर काही पंचांनी आपल्याला येणाऱ्या समस्या मांडल्या, त्यावर प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी योग्य मार्गदर्शन करून त्यांचे निरसन केले. तसेच पंच समिती अध्यक्ष श्री. महेंद्र हळदणकर यांनी पंच परीक्षेत जे पंच उत्तीर्ण झाले, त्यांना प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आले. त्यानंतर शिबिराची सांगता करताना शिबिरास उपस्थित असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य व मोठ्या संख्खेने उपस्थित पंचांचे आभार व्यक्त करून शिबिर संपले असे जाहीर केले.

## मुंबई शहर कबड्डी असोसिएशन पंच समिती (सन २०२५-२६)

**अध्यक्ष :-** श्री. महेंद्र हळदणकर **सचिव :-** श्री. सूर्यकांत देसाई

सर्वश्री :- निवृत्ती आजगेकर, सूर्यकांत कदम, प्रकाश चव्हाण, प्रकाश रेडेकर, सुनिल नागवेकर, जितेश शिरवाडकर, संतोष भारती, अशोक घेवडे, सुनिल नवले, प्रशांत मेस्त्री, गजेंद्र घाग, सुरेश दोरूगडे, संदीप पाटील, जी. करूणाकरण, सुशांत सावंत, विजय खरात.

**महिला सदस्या :-** सौ. माधुरी वरळीकर (वैती), सौ. प्राजक्ता परब (कांबळी), सौ. सोनाली गांवकर (जागडे)

## मुंबई शहर कबड्डी असोसिएशन पंच परिक्षा (सन २०२५-२६)

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्यावतीने दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हास्तरीय कबड्डी पंच परीक्षा आयोजित करण्यात आली होती.

पंच परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांना मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या खजिनदार सौ. शुभांगी पाटील यांनी चार दिवस पंच वर्ग घेऊन विशेष मार्गदर्शन केले.

परीक्षेत एकूण ९० विद्यार्थी बसले होते, त्या पैकी ८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. गुणानुक्रमाने पुढील विद्यार्थी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

१) श्री. विद्युत सुरेश कोरगांवकर - प्रथम क्रमांक
२) श्री. शेखर हरिश खुटाळे - द्वितीय क्रमांक
३) श्री. अथर्व विजय मोहिते - तृतीय क्रमांक

## अखिल भारतीय फेडरेशनची पंच परीक्षा २०२६

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन आयोजित अखिल भारतीय फेडरेशनची पंच परीक्षा घेण्यासाठी प्रथम उजळणी वर्गात दिनांक २२ ते २४ मे २०२६ या कालावधीत श्री. जगमोहन व श्री. विश्वास मोरे यांनी कबड्डी नियमांवर मार्गदर्शन केले आणि नंतर दिनांक २५ मे २०२६ रोजी भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. १४३ विद्यार्थ्यांनी या पंच परीक्षेमध्ये सहभाग घेतला होता. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनकडून या पंच परिक्षेसाठी खजिनदार सौ. शुभांगी दिनेश पाटील यांची परीक्षक म्हणून नियुक्ती केली होती.

## महाराष्ट्र राज्य राजस्तरीय पंच परीक्षा २०२६

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनची पंच परिक्षा घेण्यासाठी प्रथम उजळणी वर्गात दिनांक ४ ते ६ ऑगस्ट २०२६ या कालावधीत खजिनदार सौ. शुभांगी पाटील यांनी कबड्डी नियमांवर मार्गदर्शन केले आणि रविवार दिनांक ९ ऑगस्ट २०२६ भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई येथे राज्यस्तरीय पंच परिक्षा आयोजित करण्यात आली होती. २९ विद्यार्थ्यांनी या पंच परीक्षेमध्ये सहभाग घेतला होता. महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनकडून या पंच परिक्षेसाठी श्री. महेंद्र अनंत हळदणकर यांची केंद्रप्रमुख म्हणून नियुक्ती झाली होती.

## जिल्हा अजिंक्यपद चाचणी कबड्डी स्पर्धा २०२५-२०२६

प्रतिवर्षा प्रमाणे मुंबई शहर कबड्डी असोसिएशन आयोजित जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा दिनांक २४ ते ३० ऑक्टोबर २०२५ रोजी किशोर-किशोरी गट दिनांक ११ ते १५ नोव्हेंबर २०२५ रोजी व कुमार-कुमारी, दिनांक २० ते ३० जानेवारी २०२६ रोजी तर व्यावसायिक प्रथम व द्वितीय, व्यावसायिक महिला, स्थानिक पुरूष अ, ब आणि क गट, तसेच महिला गट या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धा कालावधीत मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे, कार्योपाध्यक्ष श्री. रामचंद्र जाधव, खजिनदार सौ. शुभांगी पाटील, संयुक्त कार्यवाह श्री. भरत मुळे, श्री. शरद कालंगण व सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते

स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष आमदार श्री. भाई जगताप, शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री. जया शेट्टी व सौ. छाया शेट्टी, आमदार मा. श्री. महेश सावंत, श्री. पवन जाधव (युवा सेना), प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे, कार्योपाध्यक्ष श्री. रामचंद्र जाधव इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## विजयी, उपविजयी संघांची नावे

**किशोर गट (पूर्व विभाग) वजन ५५ किलो, वय १६ वर्ष**

**स्व. संजय आयरे व श्रीकृष्ण आयरे स्मृती चषक**

**अंतिम विजयी** - गुडमॉर्निंग स्पोर्टस् क्लब (ना.म.जोशी)

**अंतिम उपविजयी** - शिवमुद्रा प्रतिष्ठान (करीरोड)

**किशोर गट (पश्चिम विभाग) वजन ५५ किलो, वय १६ वर्ष**

**स्व. संजय आयरे व श्रीकृष्ण आयरे स्मृती चषक**

**अंतिम विजयी** - विजय क्लब-अ (दादर)

**अंतिम उपविजयी** - गोल्फादेवी सेवा मंडळ-अ (वरळीगांव)

**किशोरी गट (पूर्व विभाग) वजन ५५ किलो, वय १६ वर्ष**

**अंतिम विजयी** - शताब्दी स्पोर्टस् क्लब (धारावी)

**अंतिम उपविजयी** - श्री स्वामी समर्थ क्रीडा मंडळ (भायखळा)

**किशोरी गट (पश्चिम विभाग) वजन ५५ किलो, वय १६ वर्ष**

**अंतिम विजयी** - अमरहिंद मंडळ (दादर)

**अंतिम उपविजयी** - भारतमाता स्पो. (एलफिन्स्टन)

**कुमार गट (पूर्व विभाग) वजन ७० किलो, वय २० वर्ष - स्व. दत्ताजी नलावडे स्मृती चषक**

**अंतिम विजयी** - गुडमॉर्निंग स्पो. क्लब (ना.म.जोशी)

**अंतिम उपविजयी** - साऊथ कॅनरा स्पो. क्लब (माझगांव)

**कुमार गट(पश्चिम विभाग) वजन ७० किलो,वय २० वर्ष-स्व. दत्ताजी नलावडे स्मृती चषक**

**अंतिम विजयी** - सिध्दीप्रभा फाऊंडेशन (प्रभादेवी)

**अंतिम उपविजयी** - विजय क्लब (अ) (दादर)

**कुमारी गट (पूर्व विभाग) वजन ६५ किलो, वय २० वर्ष**

**- स्व. सौ. द्रौपदी मारुती जाधव स्मृती चषक -**

**अंतिम विजयी** - श्री स्वामी समर्थ क्रीडा मंडळ (भायखळा)

